महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/ आस्था/ /2022-23, **दिनांक :-**

## परिपत्रक

विषय :- MPSC परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2022-23 साठी घेण्यात आलेल्या प्रवेश चाचणीचा निकाल व तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांची सुधारित यादी प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत MPSC परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2022-23 साठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रशिक्षण प्रवेशासाठी दि.12/07/2022 रोजी छाननी परीक्षा घेण्यात आलेली होती.

दि.03/08/2022 रोजी सर्व उमेदवारांच्या नोंदणी क्रमांकवार तसेच प्राप्त गुणवार निकालाच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर प्राप्त गुण, मुळ जाहिरात व योजनेच्या तपशीलात नमुद पात्रतेचे निकष, सामाजिक प्रवर्गनिहाय मंजुर उमेदवारांची संख्या या आधारावर प्रशिक्षणार्थींच्या प्रवर्गनिहाय (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग) तात्पुरत्या निवड याद्या (Provisional Selection List) या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदरच्या याद्या नोंदणीकृत उमेदवारांनी सादर केलेल्या वैयक्तिक माहिती व प्राप्त आवश्यक माहितीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत. असे असले तरी तात्पुरत्या निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी त्यांचेकडील पुढील मुळ प्रमाणपत्रे, दस्तएवेज पडताळणीसाठी व अंतीम निवड करण्यासाठी तयार ठेवावे. सदर तपासणीचे स्थळ व दिनांक यथावकाश कळविण्यात येतील.

1. जातीचे प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र
2. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
3. अधिवास (Domicile) प्रमाणपत्र
4. आधारकार्ड
5. वर्ग 10 वी ची गुणपत्रिका
6. वर्ग 12 वी ची गुणपत्रिका
7. पदवी प्रमाणपत्र / गुणपत्रिका

कोणत्याही माध्यमातुन उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची दोषपुर्ण व दिशाभुल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढल्यास तसेच सारथी संस्थेच्या निवडयादीत समावेश असल्याचे आढल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

**टीप**:- सदरच्या प्रसिध्द केल्यात येत असलेल्या Provisional List मधील काही उमेदवार UPSC प्रशिक्षणाच्या सुधारित तात्पुरती निवड यादी (Revised Provisional Selected List) मध्ये सुध्दा आढळुन आले आहेत. अशा उमेदवारांना MPSC किंवा UPSC यापैकी कोणत्याही एका प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे. याबाबत अशा उमेदवारांकडुन पर्याय मागविण्यात येईल. याबाबत त्यांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. अशाप्रकारे कार्यवाही पुर्ण झाल्यावर MPSC/UPSC यातील शिल्लक जागांवर संबधित प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

UD:\Office Work file -A\Latter..docx377